Muktai Memorial School ★ Kunjirwadi ★

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन( अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

# महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१११४/प्र.क्र.४०/एसएम- २

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: २६ फेब्रुवारी, २०१४

<u>वाचा -</u>

1. **शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक नाहप्र-२००९ /(६६३/०९) / माशि - १, दिनांक २० जून, २०१२.**
2. **शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. अमाशा/ स्वयंअर्थ/२०१३/६०४५४/१५-क(५)/१२०१९, दिनांक २४ डिसेंबर, २०१३.**

<u>प्रस्तावना -</u>

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा यथास्थिती, उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेस दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याकरिता तरतुदी करणे, तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासह, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे, त्याकरिता अर्ज मागविणे, व विहित पध्दतीने परवानगी देणे, यासाठी महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) पारित केला असून सदर अधिनियम शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अंमलात आला आहे. तसेच, सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छूक **असणा-**या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी व नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता दिनांक २० जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विस्तृत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर खाजगी नवीन शाळांना शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करिता नविन शाळा मान्यता देणे, विद्यमान शाळांचा दर्जा वाढ करणे याकरिता दिनांक ०८ ऑगस्ट,२०१३ पर्यंत अर्ज मागविण्यात

Muktai Memorial School 11039142 17/05/2014 Kunjirwadi

ब) ज्या व्यवस्थापनास सन २०१४-१५ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन किंवा दर्जावाढ करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच <u>**रद्दबातल**</u> ठरेल.

क) **सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई** इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास / शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून **परवानगी (Permission)** दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार **ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस **मान्यता** (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या **संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी **ना-हरकत (N.O.C.)** प्रमाणपत्र देईल.

२.३ सोबतच्या **विवरणपत्रातील** यादीनुसार परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ** शाळांना

i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच,

ii) **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे <u>**बंधनकारक**</u> राहील

२.४ सदर आदेश सर्व व्यवस्थापन/संस्थांना १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित सर्व शिक्षण उपसंचालक यांची राहील.

२.५ संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

२.६ संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम,** शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआपच रद्द** समजण्यात येईल.

२.७ **यु-डायस डाटा-** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ शाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,

*"स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा"* म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता "स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

संदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०२२८११२४०१९९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramchandra Ganpat Gunjal

Digitally signed by Ramchandra Ganpat Gunjal
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Ramchandra Ganpat Gunjal
Date: 2014.03.01 11:46:12 +05'30'

(रा.ग.गुंजाळ)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, शालेय शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. सर्व महानगर पालिकांचे आयुक्त
३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
५. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
६. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. विभागांतर्गत सर्व संचालक.
९. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१०. सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)
११. सर्व शिक्षण निरीक्षक (पश्चिम / उत्तर / दक्षिण) बृहन्मुंबई.

१२. संबंधित प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगर परिषद/नगर पालिका

**प्रत माहितीसाठी अग्रेषित :-**

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.

२. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.

३. मा. मुख्य सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक

४. सर्व सहसचिव / उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.

५. निवडनस्ती (एसएम २).

Muktai Memorial School ★ Kunjirwadi ★ 11039/42 17/05/2014

शासन निर्णय क्र. एसएफएस-1114/प्र.क्र. 40/एसएम- 2, दिनांक 26 फेब्रुवारी 2014 चे सहपत्र

| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव व ठिकाण | नवीन शाळा/ दर्जावाढ | प्रकार | माध्यम | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 193 | पुणे | पळसनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, पळसदेव, ता.इंदापूर, जि.पुणे | श्री पळसनाथ प्राथमिक विद्यालय, पळसदेव, ता.इंदापूर, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | मराठी | पात्र |
| 194 | पुणे | महाराष्ट्र आरोग्य मंडळ, माळवाडी, हडपसर, पुणे-28 | डॉ. दादा गुजर इंग्लिश मिडीयम स्कूल, महंमदवाडी, हडपसर, पुणे-60 | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| 195 | पुणे | कर्मवीर शिक्षण संस्था रुई, ता.इंदापूर, जि.पुणे | श्री बाबीर इंग्लिश मिडीयम स्कूल, रुई, ता.इंदापूर, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 196 | पुणे | सुरज फौंडेशन, कुपवाड, ता.मिरज, जि.सांगली | सुरज फौंडेशन इंग्रजी माध्यम स्कूल, मुढवा, पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 197 | पुणे | मोरे एज्युकेशन सोसायटी, चिखली, पुणे | श्रीमती हौसाबाई नारायण मोरे इंग्लिश मिडीयम स्कूल, मोरेवस्ती, चिखली, पुणे-62 | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 198 | पुणे | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले संस्था,चिचवड, पुणे-19 | डी.बी.निंबारकर इंग्लिश मिडीयम स्कूल, मोहननगर, चिंचवड, पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 199 | पुणे | श्री. संत शिरोमणी तुकाराम महाराज प्रतिष्ठान झारगडवाडी, ता.बारामती, जि.पुणे | संत तुकाराम महाराज प्राथमिक विद्यालय, डोर्लेवाडी, ता.बारामती, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | मराठी | पात्र |
| 200 | पुणे | नामदेवराव मोहोळ विद्या व क्रिडा प्रतिष्ठान, पुणे-30 | प्राथमिक विद्यालय, घोटवडे फाटा, पिरंगुट, ता.मुळशी, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 201 | पुणे | भाग्यमथुरा शिक्षण मंडळ, कुंजीरवाडी, ता.हवेली, जि.पुणे | मुक्ताई मेमोरिअल स्कूल, कुंजीरवाडी, ता.हवेली, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 202 | पुणे | जैद पाटील एज्युकेशन सोसायटी,चिंबळी, ता.खेड, जि.पुणे | शांताई मेमोरिअल स्कूल, काळेचीवाडी, ता.खेड, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 203 | पुणे | पुरंदर टेक्निकल एज्युकेशन सोसायटी, शिवाजीनगर, पुणे | पुणे केंब्रिज पब्लिक स्कूल, धनकवडी, पुणे-43 | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी - मराठी | पात्र |
| 204 | पुणे | गुंजवणी शिक्षण संस्था, हातवे, ता.भोर, जि.पुणे | विजयादेवी इंग्लिश स्कूल, हातवे बु., ता.भोर, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 205 | पुणे | श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण, मांडवगण फराटा, ता.शिरुर, जि.पुणे | नामदार श्री शरदचंद्र पवार पब्लिक स्कूल, मांडवगण फराटा, ता.शिरुर, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |

शासन निर्णय क्र. एसएफएस-1114/प्र.क्र. 40/एसएम- 2, दिनांक 26 फेब्रुवारी 2014 चे सहप.I

| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव व ठिकाण | नवीन शाळा/ दर्जावाढ | प्रकार | माध्यम | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 2214 | सोलापूर | श्री विठठल शिक्षण प्रसारक मंडळ जुजारपूर ता सांगोला सोलापूर | आदर्श विदयामंदीर कनिष्ठ महाविदयालय जुजारपूर ता सांगोला सोलापूर | नवीन शाळा | नवीन उच्च माध्यमिक | मराठी | पात्र |
| 2215 | सोलापूर | श्री स्वामी नारायण गुरुकुल सोलापूर | श्री स्वामीनारायण गुरुकुल इंटरनॅशनल स्कूल अक्कलकोट रोड कुंभारी सोलापूर | नवीन शाळा | नवीन उच्च माध्यमिक विज्ञान | इंग्रजी | पात्र |
| 2216 | हिंगोली | लक्ष्मी महिला मंडळ लोहगाव ता.जि.हिंगोली | ज्ञान सरस्वती उच्च माध्यमिक विद्यालय लोहगाव ता.जि.हिंगोली | नवीन शाळा | उच्च माध्यमिक कला व विज्ञान | मराठी | पात्र |
| 2217 | हिंगोली | चैतन्य सेवा प्रतिष्ठाण सांडस ता.कळमनुरी | जय भवानी उच्च माध्यमिकविद्यालय उमरा ता.कळमनुरी | नवीन शाळा | उच्च माध्यमिक | मराठी | पात्र |

**शिक्षणहक्क कायद्यातील तरतूदीनुसार अनधिकृत शाळांविरुध्द कारवाई करण्याबाबत ....**

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
**शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१२/(११०/१२)/माशि १**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२.
**दिनांक :-** २० ऑगष्ट, २०१२ / 22 ऑगस्ट, 2012

**संदर्भ:-** शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२००९/(९१३/०९)/माशि-१, दि.१९ जून २०१०

**शासन निर्णय -**

राज्यामध्ये शासन मान्यता नसलेल्या अनधिकृतरित्या चालविण्यात येणा-या शाळा संदर्भात शिक्षण हक्क कायद्यातील तरतूदीनुसार कारवाई करण्याबाबतचे आदेश संदर्भाधिन शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहेत. तथापि सदर आदेशामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली असल्याने संदर्भाधीन शासन निर्णयास याद्वारे पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in. या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. 201208221117420500 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(र.प्र.आटे)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

**प्रति,**
शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मंबई.

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या संकल्पाविषयी ..

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन परिपत्रक क्रमांक शै.गु.वि. २०१५ (११५/१५)/एस.डी. ६
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय (विस्तार), मुंबई - ४०० ०३२
दिनांक - ७ जुलै, २०१५

वाचा:- शासन निर्णय, शैगुवि २०१५/(८०/१५)एस.डी.६, दिनांक २२ जून, २०१५

शासन परिपत्रक

शासन निर्णय दिनांक २२ जून, २०१५ अन्वये प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाची अंमलबजावणी राज्यामध्ये शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून करणेबाबत आदेश निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर आदेशाचा हेतू हा विद्यार्थ्यांच्या गणित व प्रथमभाषा या विषयाची शैक्षणिक प्रगती तपासणे करीता चालू शैक्षणिक वर्षामध्ये विविध चाचण्या घेणे व त्यामध्ये सुधारणा करणे करीता शिक्षक व अधिकारी यांना त्यांचे गरजे नुसार संकेतस्थळ, व्हिडिओ यासारख्या नवीन स्रोतांचा वापर करणेसाठी त्यांना स्वातंत्र्य देणे हा आहे.

सदरहू शासन निर्णयाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांचे गणित व मराठी विषय सुधारण्या करीता काही महत्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत. त्याचे अवलोकन करुन शिक्षण क्षेत्राशी संबंधित व्यक्तींनी त्याचा अवलंब करावा असे वाटते.

गणित

१. विद्यार्थ्यांमध्ये गणित विषयाच्या आकलन क्षमतेमध्ये सुधारणा करणेसाठी विद्यार्थ्यांची गणित विषयासंबंधीची समज, कौशल्ये,विचार क्षमता इत्यादी तपासण्यासाठी काही वेगळ्या प्रकारच्या प्रश्नांचा अंतर्भाव चाचण्यांमध्ये केला आहे. विद्यार्थ्यांना कदाचित या प्रकारच्या प्रश्नांचे अनुभव या आधी मिळाले नसतील. त्यामुळे अशा प्रकारच्या प्रश्नांच्या चाचणी पूर्वी सराव करून शिक्षकांनी जरूर घ्यावा.त्यामुळे विद्यार्थ्यांना ते प्रश्न चाचणीमध्ये सोडविणे सोपे होईल. सदरचे प्रश्न गोपनीय नाहीत. परंतू, चाचणीतील विशिष्ट प्रश्नांची उत्तरे पाठ करून घेऊ नयेत, याची दक्षता घ्यावी.

२. विद्यार्थ्यांची संख्याबाबतची समज लक्षात घेताना केवळ त्यांचे संख्येचे वाचन / लेखन तपासून भागत नाही.विद्यार्थ्यांस एखादी संख्या वाचण्यास किंवा लिहिण्यास सांगीतली तर त्यातील संख्येनुसार ती त्याला एकक-दशक-शतक या स्थानानुसार वाचता/लिहिता आली पाहिजे. विद्यार्थ्यांना अंकाचे स्थान समजून देण्यासाठी शिक्षकांनी काडयाचे गठ्ठे, मणी, माळा यांचा वापर करावा. तसेच एक, दहा, शंभर, पाचशे व एक हजाराच्या खोट्यानोटाजमवून अथवा मुलांच्या मदतीने कार्डावर लिहून संख्या तयार करणे, जमिनीवर अथवा पाटीवर आखलेल्या कोष्टकामध्ये ती मांडणे व त्यानुसार संख्या अंकात लिहिणे ती वाचणे याचापुन्हा-पुन्हा सराव करुन घ्यावा.

३. मुलांना वरील प्रकारचे अनुभव / प्रात्यक्षिक देवून चाचणी पूर्वी सराव जरूर करुन घ्यावा. आपण ह्या चाचण्या चांगला निकाल दाखवण्यासाठी आपणही चाचणी घेत नाही तर सदरच्या चाचण्या ह्या आपण सध्या अध्यापन व अध्ययन या क्षेत्रामध्ये कोणत्या टप्प्यावर आहोत याचे आकलन करुन घेण्यासाठी घेत आहोत. जेणे करुन आपणांस पुढील कामाची आखणी आपणांस करणे सोपे जाईल. निकाल चांगला यावा यासाठी चाचण्या मधीलच प्रश्नांची उत्तरे पाठ करून घेऊ नका. चाचण्या मधील प्रश्न पहा व त्याचा मागदर्शका सारखा वापर करावा. चाचण्या मधील प्रश्नपहा, संख्या बदलून, प्रश्न बदलून त्याप्रकारचे प्रश्न सोडवूनघ्या. मुलांची समज वाढू द्या.

४. विद्यार्थ्यांची गणित विषयाची समज वाढण्यासाठी पुढीलप्रकारच्या प्रात्यक्षिकांचा समावेश करता येईल-

- एखाद्या गणिताविषयी चिंतन/मनन करुन त्याचे उत्तरलिहिण्याचेकिंवालेखी चाचण्यांमध्ये विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहून काढणे.
- प्रतिकांचा वापर करुन संख्या वाचून/लिहून दाखविणे किंवा संख्या वाचून/लिहून प्रतिके सांगणे.
- त्रिकोण, चौकोन, आयत यामधील चौकटी मोजून गुणाकार करणे.
- टेलरिंगटेप / मोजपट्टीच्या सहाय्याने लांबी मोजणे, परिमिती मोजणे.
- कोनमापकाच्या सहाय्याने कोन मोजणे व दिलेल्या मापाचा कोन काढणे.
- कंपासच्या सहाय्याने वर्तुळ काढणे.
- रंगवलेला भाग अंश छेद रूपात व दशांशात लिहिणे, सांगितलेला अपूर्णां करंगवणे.

विद्यार्थ्यांची गणित विषयाची लेखी परीक्षा घेत असताना फक्त गणिताची समज आणि गणिताचे उत्तर आले किंवा नाही आले इतकेच शिक्षकाने तपासावे. उत्तरा मध्ये मांडणी, रीत, शुद्धलेखन यातले काहीही तपासायचे नाही.त्याकरीता इयत्ता दुसरी व तिसरीच्या मुलांसाठी एक एक प्रश्न वाचत ते प्रश्न त्यांना समजावून सांगावेत त्यानंतर त्यांना सोडण्यास सांगावेत. अगदी आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना गरज असेल तेथे प्रश्न वाचून दाखवावेत.

## प्रथम भाषा

भाषा ऐकून समजणे, बोलता येणे, वाचून समजणे आणि भाषा लिहिता येणे ही भाषा विकासाची चार प्रमुख अंगे आहेत.पायाभूत चाचणीतून या चारही अंगाचा विकास कसा करता येईल याबाबतची चाचपणी व्हावी असा उद्देश आहे.त्याकरीता विद्यार्थ्यांची भाषा विषयासाठी तोंडी व लेखी असे दोन्ही प्रश्न-प्रकारात चाचणी घेण्यात यावी.

भाषेच्या विकासासाठी विद्यार्थ्यांची आठ ते दहा मिनिटे तोंडीचाचणीघेवून त्यामध्ये त्याला विविध प्रश्न विचारावेत. वर्गात जास्त पटसंख्या असणा-या शिक्षकांनी रोज पाच ते सहा विद्यार्थी या प्रमाणात आठवडाभर तोंडी चाचणी घ्यावी.

विद्यार्थ्यांच्या प्रकट वाचनाचे निरीक्षण करणे हा भाग तोंडी चाचणीत नव्यानेच प्रस्तृत करण्यात येत आहे. सदरचे निरीक्षण कसे करावे या विषयीच्या सविस्तर सूचना तोंडी चाचणी सोबतच्या प्रश्नावली सोबत पाठवण्यात येणार आहेत. (वाचणे म्हणजे लेखी मजकूराचा अर्थ लावणे आणि लिहिणे म्हणजे आपल्या मनातील विचार, भावना लिहून व्यक्त करणे असा अर्थ लक्षात घेऊन सदरची प्रश्नावली बनवण्यात आली आहे.)

वाचन आणि लेखनही औपचारिक शिक्षणाची साधने आहेत. त्यांच्यावर पुरेसे प्रभुत्व नसेल तर इतर शालेय विषय शिकतानाही अडचणी येतात. म्हणून प्रत्येक विद्यार्थ्याला समजून वाचता येणे आणि स्वत:च्या मनाने लिहिता येणे हे आपले ध्येय आहे.

प्रथमच वाचायला शिकलेल्या विद्यार्थ्यास त्यांच्या अनुभव विश्वातील मजकूर वाचायला मिळणे, त्याचे आकलन त्यास होणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे इयत्ता पाचवी पर्यंत ग्रामीण व शहरी मुलांसाठी एकाच कठीण पातळी चेपरं तू वेगवेगळ्या विषयां वरील मजकूर चाचणीत वापरण्यात आले आहेत. शहरातील एखाद्या विद्यार्थ्यास सार्वजनिक बागे विषयीचा मजकूर समजायला सोपा वाटेल तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यास गावातील जत्रा, गोष्ट, बातमी, जाहिरात, कविता, याबाबतचा विवरणात्मक उतारा असे विविध लेखन प्रकार

मुलांना "वाचून आकलन" याप्रश्नात दिले आहेत. सदर प्रश्नाचा सराव करीत असताना शिक्षकांनी त्यांचे परिसरातील विविध मजकूराचे लिखाण करावे व त्याचा सराव विद्यार्थ्यांकडून करुन घ्यावा.

साधारणपणे विद्यार्थ्याच्या घरामध्ये बोलली जाणारी भाषा व शाळेमध्ये शिक्षणासाठी वापरली जाणारी भाषा यामध्ये बरेचअंतरआहे. विद्यार्थी त्याचे विचार, भावना लिखाणाच्या स्वरुपातून अभिव्यक्त करीत असताना उपरोक्त दोन्ही भाषांचा वापर करतो. त्यावेळी शिक्षकांनी असे लिखाण चुकीचे मानून न घेता विद्यार्थ्यास त्याच्या लिखाणातून काय म्हणायचे आहे हे समजून घ्यावे. मुलांची अभिव्यक्ती कशी तपासावी या बाबतची सविस्तर माहिती चाचणी सोबत दिली आहे.

अशा प्रकारच्या चाचण्यांचे आयोजन केल्यामुळे वर्गातील अध्यापन व अध्ययन या प्रक्रियेला दिशा प्राप्त होईल.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०८०४१२०२४५८१२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Nandkumar

Digitally signed by Nandkumar
Date: 2015.08.04 12:05:59 +05'30'

(नंदकुमार)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :- मा.मंत्री शालेय शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
प्रत :- माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव

१) आयुक्त (शिक्षण) आयुक्त शिक्षण यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य पुणे
२) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या परिषद) पुणे
४) शिक्षण संचालक, (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, पुणे
५) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय, पुणे
६) शिक्षण संचालक (अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण), शिक्षण संचालनालय, पुणे,
७) आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
८) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
९) विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग
१०) मुख्याधिकारी सर्व नगरपालिका /नगरपरिषद
११) शिक्षण निरिक्षक उत्तर/दक्षिण/पश्चिम
१२) प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, (सर्व)
१३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/निरंतर) जिल्हा परिषद (सर्व)
१४) शिक्षणाधिकारी / शिक्षणप्रमुख / प्रशासनाधिकारी, महानगरपालिका (सर्व)